सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/ बॅन्ड मास्टर-सेवाप्रवेश नियम /०३/२०१८ मुंबई, दि. १२ /१०/२०२६

विषय :- महाराष्ट्र पोलीस मधील बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट -अ (सेवाप्रवेश) नियम, २०२६

******

परिपत्रक :-

महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग चार-ब, गृह विभाग क्र. सेप्रनि-२३२२/ प्र.क्र.७७/ पोल-५अ, दि.२८/०९/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस दला मधील बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट -अ या पदाचे सेवाप्रवेश नियम, २०२६ मंजुर करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र शासनाच्या mahaonline.gov.in या संकेतस्थळावर view egazzete या शिर्षाखाली उपलब्ध आहेत.

२. तरी, खालील घटक प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, शासनाने दि.२८/०९/२०२६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केलेल्या बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(सुप्रिया पाटील यादव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त बृहन्मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्राचार्य, राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज, दौंड, पुणे

प्रत,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह) (बृहन्मुंबई वगळून)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते २०
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, म.राज्य, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन राजपत्राची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर महाराष्ट्र पोलीस दलामधील बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट -अ (सेवाप्रवेश) नियम, २०२६ या विषयाखाली कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. ३६

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १४९] सोमवार, सप्टेंबर २८, २०२६/आश्विन ६, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ५३७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ सप्टेंबर, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक सेप्रनि-२३२२/प्र.क्र.७७/पोल-५अ.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या, खंड (ख) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेले सर्व विद्यमान नियम, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, पोलीस महासंचालकाच्या कार्यालयातील बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट-अ या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांस, पोलीस बँड युनिट, महाराष्ट्र पोलीस मधील बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) हे नियम, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**— या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, पोलीस महासंचालक, जे, बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) या पदावर उमेदवाराची नियुक्ती करणारे सक्षम प्राधिकारी, असा आहे;

(ख) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(ग) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली, अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(घ) "पोलीस महासंचालक" याचा अर्थ, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ६ अन्वये, नियुक्त करण्यात आलेले पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(च) "गृह विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग, असा आहे;

३. बँड मास्टर (पोलीस निरीक्षक) गट-अ या पदावरील नियुक्ती आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, पुढील निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांमधून करण्यात येईल :—

(एक) वयोमर्यादा.—

(क) किमान वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास तेहतीस वर्षे वय पूर्ण केलेले असावे.

(ख) कमाल वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अठ्ठेचाळीस वर्षे वय पूर्ण व राखीव प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी पन्नास वर्षे वय पूर्ण केलेले असावे.

(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.— सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली, अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असावी.

(तीन) शारीरिक अर्हता.—

(क) पुरुषांकरिता शारीरिक प्रमाण.—

(एक) किमान उंची १६५ से.मी. (अनवाणी)

(दोन) छाती न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी आणि न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा.

(ख) महिलांकरिता शारीरिक प्रमाण.- किमान उंची १५७ से.मी. (अनवाणी)

(ग) तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) पुरुषांकरिता शारीरिक प्रमाण.- किमान उंची १६५ से.मी. (अनवाणी)

(घ) तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) महिलांकरिता शारीरिक प्रमाण.- किमान उंची १५७ से.मी. (अनवाणी)

(चार) किमान तांत्रिक अर्हता.-(क) रॉयल स्कूल ऑफ म्युझिक, लंडन (एआरएसएम) चा सहयोगी; किंवा

(ख) रॉयल स्कूल ऑफ म्युझिक, लंडनच्या सहयोगी मंडळाची पदविका (एआरएसएम पदविका); किंवा

(ग) ट्रिनिटी महाविद्यालय, लंडन (एटीसीएल) चा सहयोगी; किंवा

(घ) संगीत महाविद्यालय, लंडन (एएलसीएम) चा सहयोगी; किंवा

(ङ) लष्करी शिक्षण कोर प्रशिक्षण महाविद्यालय व केंद्र, पचमढी, मध्य प्रदेश येथून लष्करी संगीत शिक्षणातील सनदधारक.

(पाच) अनुभव.— भारतीय सेना, हवाई दल, नौदल किंवा केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या बँड युनिटमध्ये वाद्य वाजविण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव धारण केलेला असावा.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिविक्षाधीन असेल. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविण्यात येईल. उक्त पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीला, विहित केलेली विभागीय परीक्षा, तीन प्रयत्नांमधून कोणत्याही एका प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील व विहित केलेले प्रशिक्षण, असल्यास, पूर्ण करावे लागेल आणि विहित केलेला परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण करावा लागेल. जर, ती व्यक्ती, विभागीय परीक्षा किंवा विहित केलेले प्रशिक्षण किंवा परिविक्षाधीन कालावधी विहित केलेल्या कालमर्यादेत समाधानकारकरीत्या पूर्ण करण्यात अपयशी झाल्याचे आढळून आल्यास, तिची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करावयाची व्यक्ती, अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती व्यक्ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी, केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, ती व्यक्ती, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला, संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित

कालमर्यादेत धारण करील, अन्यथा ती व्यक्ती, असे प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

७. (१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा याबाबत, शासनाने, वेळोवेळी, केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील, अन्यथा अशी व्यक्ती उक्त पदावर नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यास अपात्र असेल.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींची जेष्ठता सूची राज्यस्तरावर ठेवली जाणार असल्याने, सदर पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

९. शासनाने, वेळोवेळी, निर्गमित केलेले कोणतेही नियम किंवा घेतलेले निर्णय यांमध्ये, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीआधी किंवा नंतर, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रविंद्र पाटील,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated the 28th September, 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA POLICE ACT.

No. Seprani-2322/C.R.77/Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951) and in supersession of all existing rules, orders and instruments made in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules regulating recruitment to the posts of Band Master (Police Inspector), Group-A, in the Office of the Director General of Police under the administrative control of the Home Department of Government of Maharashtra, namely :—

1. Short title and commencement.

(1) These rules may be called the Band Master (Police Inspector), Group-A in Police Band Unit of Maharashtra Police (Recruitment) Rules, 2026.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette.*

2. Definitions. In these rules, unless the context requires otherwise,—

(a) "Appointing Authority" means the Director General of Police who shall be the competent authority to appoint a candidate to the post of Band Master (Police Inspector), Group-A;

(b) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(c) "Degree" means a degree of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(d) "Director General of Police" means the Director General and Inspector General of Police. Maharashtra State, appointed under section 6 of the Maharashtra Police Act.

(f) "Government" means the Government of Maharashtra;

(g) "Home Department" means Home Department of the Government of Maharashtra;

3. Appointment to the post of the Band Master (Police Inspector), Group-A, shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, who fulfils the following criteria, namely :—

(i) Age limit.—

(A) Lower Age limit.— Thirty-three years of age should be completed as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age limit.— Forty-eight years of age completed for the persons not belonging to a reserved category and fifty years of age completed for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualification.— Possesses a degree of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto.

(iii) Physical Eligibility.—

(A) Physical standards for male.—

(I) Minimum height 165 centimetres (barefooted);

(II) Chest girth shall not be less than 79 centimetres deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimetres.

(B) Physical standards for female.- Minimum height 157 centimetres (barefooted).

(C) Physical standards for transgender male.- Minimum height 165 centimetres (barefooted).

(D) Physical standards for transgender female.-Minimum height 157 centimetres (barefooted).

(iv) Minimum Technical Qualification.- (A) Associates of Royal School of Music, London (ARSM); or

(B) Diploma of the Associated Board of the Royal School of Music, London (Dip. ARSM); or

(C) Associate of the Trinity College of London (ATCL); or

(D) Associate of the London College of Music (ALCM); or

(E) Licentiate Military Music Education (LMME) by Army Education Corps Training College and Centre, Pachmarhi, Madhya Pradesh.

(v) Experience. Possesses a minimum of five years of experience playing instruments in a band unit of Indian Army, Air Force, Navy or Central Armed Police Forces.

4. A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year. A person appointed to the post shall be required to pass the prescribed Departmental Examination, if any in three attempts, and to complete the prescribed training, if any, and complete the probation period satisfactorily. If he does not pass the Departmental Examination or does not complete the prescribed training or does not complete the probation period satisfactorily within the prescribed period, his services shall be liable to be terminated.

5. A person appointed to the posts mentioned in rule 3 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he passes those examinations.

6. A person appointed to the posts mentioned in rule 3 by nomination shall possess a certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such certificate in knowledge of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or for the promotion to the next promotional post, until he possesses such certificate.

7. (1) A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf, by the Government, from time to time, otherwise he shall not be eligible for appointment to the post.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family, shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children, then he shall be disqualified for the appointed post in Government service.

8. The seniority list of the persons appointed to post mentioned in rule 3 shall be maintained at State level. Therefore, such persons shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

9. The terms and conditions specified by the Government, in any rules or resolutions issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA PATIL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.